सा.बीड
लक्ष्यवेध
अचूक लक्ष्य भेदणारे

संपादक : निलेश पुराणिक EDITOR- NILESH PURANIK Email Id- beedlakshyavedh@gmail.com

वर्ष-३ ले अंक ५१ मंगळवार दि. २४ नोव्हेंबर २०२६ पाने ४ पोस्टल नंबर- L SB/Beed/RNP-255/2025-2027 आरएनआय नं.- MAHMAR/2023/89380 मुल्य २ रुपये

Year-3 Paper- 51 Tuesday 24 November 2026 Page-4+4 Postal No. :- L SB/Beed/RNP-255/2025-2027 RNI :- MAHMAR/2023/89380 Price- 2 Rs.



सरकारी डॉक्टरांची खासगी रुग्णालयात प्रॅक्टिस!

नेकनूर स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक बीडच्या फिनिक्स हॉस्पिटलमध्ये रुग्णांवर करतात उपचार; जिल्हा शल्यचिकित्सकांचे लक्ष आहे की नाही?

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण आणि दुर्गम भागातील सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता दूर व्हावी आणि शासकीय रुग्णालयांमधील आरोग्यव्यवस्था सक्षम व्हावी, यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र, याच शासकीय आरोग्यव्यवस्थेतील जबाबदार अधिकारी खासगी रुग्णालयात वैद्यकीय सेवा देत असतील, तर शासकीय सेवेच्या नियमांचे पालन कोण करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नेकनूर येथील स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक हुबेकर हे बीड शहरातील फिनिक्स हॉस्पिटलमध्ये रुग्णांची वैद्यकीय तपासणी करून त्यांच्यावर उपचार करीत असल्याची बाब समोर आली आहे. शासकीय पदावर कार्यरत असताना खासगी रुग्णालयात वैद्यकीय सेवा देण्यास त्यांना शासनाची परवानगी आहे का? त्यांना व्यवसायरोध भत्ता (NPA) मिळतो का? आणि या प्रकाराची वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी दखल घेतली आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती नाही की दुर्लक्ष?

डॉ. अशोक हुबेकर हे नेकनूर स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक असताना बीड येथील फिनिक्स हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय तपासणी आणि उपचार करीत असल्याची बाब समोर आली आहे. या प्रकाराची जिल्हा शल्यचिकित्सकांना माहिती आहे का? माहिती असल्यास आतापर्यंत कोणती चौकशी करण्यात आली? संबंधित डॉक्टरांना खासगी प्रॅक्टिसची अधिकृत परवानगी आहे का? त्यांना व्यवसायरोध भत्ता दिला जातो का? खासगी रुग्णालयात सेवा देण्याबाबत त्यांनी वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेतली आहे का? या प्रश्नांची उत्तरे आरोग्य विभागाने देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १६ नुसार शासकीय कर्मचाऱ्याला शासनाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे खासगी व्यवसाय किंवा अन्य रोजगार करता येत नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ३४ नुसार शासकीय कर्मचाऱ्याने पूर्णवेळ शासनाच्या सेवेसाठी उपलब्ध असणे अपेक्षित आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ७ ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयानुसार व्यवसायरोध भत्ता लागू असलेल्या गट-अ वैद्यकीय अधिकाऱ्यांना खासगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास प्रतिबंध आहे. या अधिकाऱ्यांना खासगी रुग्णालयात सेवा देणे, स्वतःचा दवाखाना चालविणे अथवा अशा व्यवसायात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग ठेवणे यावर निर्बंध आहेत. त्यामुळे संबंधित वैद्यकीय अधीक्षकांच्या नियुक्तीच्या अटी, त्यांना मिळणारा व्यवसायरोध भत्ता आणि खासगी प्रॅक्टिससाठी घेतलेली परवानगी यांची तपासणी होणे आवश्यक आहे.

तसेच दि.३० जुलै २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खासगी प्रॅक्टिससंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय दिला. शासनाची पूर्वपरवानगी नसताना खासगी वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही, या तरतुदींची वैधता न्यायालयाने मान्य केली. त्यामुळे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खासगी प्रॅक्टिसचा विषय केवळ प्रशासकीय औपचारिकता नसून सेवा नियमांच्या पालनाशी संबंधित गंभीर बाब ठरते.

नेकनूर स्त्री रुग्णालय हे परिसरातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिलांसाठी महत्त्वाचे आरोग्यसेवा केंद्र आहे. गर्भवती महिला, प्रसूतीसाठी येणाऱ्या माता तसेच विविध स्त्रीरोगांच्या उपचारांसाठी ग्रामीण भागातील रुग्ण या रुग्णालयावर अवलंबून असतात. अशा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांकडे प्रशासकीय जबाबदारीसह वैद्यकीय सेवांचे नियोजन आणि देखरेखीची महत्त्वाची जबाबदारी असते. तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता, वेळेवर उपचारांची आवश्यकता आणि आपत्कालीन परिस्थिती अशा अनेक आव्हानांना या रुग्णालयाला सामोरे जावे लागते अशा परिस्थितीत रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांची खासगी रुग्णालयातील वैद्यकीय सेवा नेमकी कोणत्या वेळेत सुरू असते? शासकीय रुग्णालयातील जबाबदाऱ्या पूर्ण करूनच ते खासगी रुग्णालयात सेवा देतात का? शासकीय रुग्णालयात एखादी गंभीर प्रसूती, गुंतागुंतीची वैद्यकीय परिस्थिती किंवा अनुभवी डॉक्टरांची तातडीची गरज निर्माण झाली, तर संबंधित अधीक्षकांची मदत रुग्णांना तत्काळ मिळणार का? खासगी रुग्णालयातील सेवा आणि शासकीय रुग्णालयातील

◀◀ पान २ वर

नव्याचे नऊ दिवस! वैभव पाटलांची कारवाई थंडावली

सुरुवातीला अतिक्रमण, रिक्षा आणि बुलेटवर धडक कारवाई आता शहरातील ट्रॅफिक, ट्रॅव्हल्स आणि पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि बेशिस्त वाहनचालकांना शिस्त लावण्याच्या उद्देशाने जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी सुरुवातीच्या काळात धडाकेबाज कारवाया केल्या. रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविणे, पार्किंगचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या ऑटो रिक्षाचालकांवर कारवाई करणे, कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेटच्या मॉडिफाइड सायलेन्सरवर कारवाईचा बडगा उगारणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी परिवहन विभागाच्या सहकार्याने विशेष कार्यशाळा आयोजित करणे, अशा उपक्रमांमुळे त्यांच्या कामाची चर्चा शहरभर झाली. मात्र, सुरुवातीला दिसलेला हा कारवाईचा धडाका आता मंदावल्याचे चित्र असून, वाहतूक व्यवस्थेतील जुन्या समस्या पुन्हा डोके वर काढत आहेत. त्यामुळे वाहतूक शाखेची कारवाई म्हणजे 'नव्याचे नऊ दिवस' ठरली का, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.



गणेशोत्सव आणि दिवाळी हे शहरातील बाजारपेठांमध्ये मोठी गर्दी होण्याचे काळ. या काळात वाहतूक शाखेने विशेष नियोजन करून प्रमुख चौक, बाजारपेठा, भाजी मंडई आणि गर्दीच्या रस्त्यांवर वाहतूक सुरळीत ठेवणे अपेक्षित होते. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात भाजी मंडई परिसरात वाहनांची सर्रास ये-जा सुरू असल्याचे चित्र दिसून आले. गर्दीच्या ठिकाणी वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी नियोजन दिसले नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे. दिवाळीच्या खरेदीच्या काळात शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक तब्बल १५ मिनिटांपर्यंत ठप्प होत असल्याचे चित्र होते. अशा वेळी वाहतूक शाखेचे नियोजन नेमके कुठे होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बीड शहरातील वाहतूक कोंडीला आणखी एक कारण म्हणजे खासगी ट्रॅव्हल्सची शहरातील वर्दळीच्या भागात होणारी पार्किंग. ट्रॅव्हल्स शहराबाहेर उभ्या करण्याबाबत जिल्हा प्रशासनाचे आदेश असतानाही काही ट्रॅव्हल्स बसस्थानक परिसरासह शहरातील भागात बिनधास्त उभ्या राहत असल्याचे चित्र दिसत आहे. मोठ्या आकाराच्या बस रस्त्यावर उभ्या राहिल्याने इतर वाहनांना अडथळा निर्माण होतो. परिणामी वाहतुकीचा वेग मंदावतो आणि कोंडीत भर पडते. प्रशासनाचे आदेश असतानाही ट्रॅव्हल्स शहरातच लागत असतील, तर त्या आदेशांची अंमलबजावणी कोण करणार? जिल्हा वाहतूक शाखेने या प्रकाराकडे लक्ष देऊन संबंधित ट्रॅव्हल्सवर कारवाई का केली जात नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

◀◀ पान २ वर

दिशादर्शक फलकाअभावी कार पुलावर धडकली

उबाळे साहेब,आणखी किती अपघातांची वाट पाहणार?

बांधकाम विभागाच्या कारभारावर संताप

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बार्शी नाका हा रस्ता सध्या वाहनधारकांसाठी धोकादायक ठरत आहे. रस्त्याचे काम सुरू असताना आवश्यक दिशादर्शक फलक, सूचना फलक, बॅरिकेड्स आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची जबाबदारी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. मात्र, या मूलभूत बाबींकडेच दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. २३ नोव्हेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास दिशादर्शक फलक नसल्याने एका कारची थेट नव्याने बांधण्यात येत असलेल्या पुलाला धडक बसली. सुदैवाने कार पुलावरून खाली कोसळली नाही; अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. या घटनेनंतर अभियंता उबाळे यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून आणखी किती अपघात झाल्यानंतर बांधकाम विभाग जागा होणार, असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत.

बार्शी नाक्याकडून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याकडे जाणारी चारचाकी कार मंदिराजवळील पुलावरून जात होती. रस्त्याचे काम सुरू असताना वाहनचालकांना पुढील रस्त्याची स्पष्ट माहिती मिळावी, यासाठी आवश्यक दिशादर्शक फलक लावणे गरजेचे होते. मात्र, असे फलक नसल्याने चालकाचा गोंधळ उडाला आणि कार थेट नव्याने बांधण्यात येत असलेल्या पुलावर जाऊन धडकली. सुदैवाने कार पुलावरून खाली कोसळली नाही. मात्र, या घटनेने रस्त्यावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

केवळ पुलाजवळच नव्हे, तर बार्शी नाका चौकातही वाहनधारकांना धोक्याचा सामना करावा लागत आहे. चौकामध्ये मोठ्या प्रमाणात खडी आणून टाकण्यात आली असून त्यावरून दुचाकी घसरून अपघात होत आहेत. काही दुचाकीस्वार जखमी झाल्याने नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. रस्त्याचे काम करताना वाहतुकीचे नियोजन आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रुग्णालयासमोरील रस्त्याचे कामही अर्धवट अवस्थेत आहे. मोठे खड्डे आणि बांधकामातील अडथळ्यांमुळे रुग्ण, रुग्णवाहिका आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णवाहिकांना रस्ता मोकळा मिळणे आवश्यक असताना संथगतीने सुरू असलेल्या कामामुळे अडचणी निर्माण होत आहेत.

सिमेंट रस्त्याचे काम झाल्यानंतरही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ साचलेली आहे. या धुळीचा त्रास पादचारी, वाहनधारक आणि परिसरातील व्यावसायिकांना सहन करावा लागत आहे. दुकानांमध्ये धूळ जात असल्याने व्यावसायिकांच्या व्यवसायावरही परिणाम होत आहे.